# 'साय-फाय' एकांकिका स्पर्धेचे आयोजन

## सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश

**मुंबई :** क्विक हिल फाऊंडेशन, थिएटर ॲकॅडेमी आणि महाराष्ट्र सायबर पोलीस यांचा संयुक्त उपक्रम 'साय-फाय करंडक'साठी राज्यातून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. साय-फाय करंडक ही एक एकांकिका स्पर्धा आहे, जिचा उद्देश तत्कालीन थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जागरूकता पसरवणे हा आहे. कॉलेज, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेशिका १५ नोव्हेंबरपर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्यवर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. साय-फाय करंडक २०१८ मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर फोन करा किंवा साय-फाय करंडक २०१७च्या पहिल्या आवृत्तीत १०० पेक्षा अधिक टीमनी सहभाग नोंदवत ही स्पर्धा यशस्वी केली होती.



थिएटर ॲकॅडमी आपले अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध नाट्यकर्मी प्रसाद पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील कान्याकोपऱ्यातून आलेल्या प्रादेशिक केंद्रांच्या टीम्सची निवड करेल. या टीम अशा समकालीन विचारप्रवण एकांकिका सादर करतील, ज्यांमध्ये डिजिटल दुनियेत आजच्या जीवनाचे प्रतिबिंब दिसत असेल. या माध्यमातून सायबर सुरक्षा जागरूकता आणण्यासाठी नावीन्यपूर्ण प्रयोग करून एक सुरक्षित सायबर विश्व उभे करण्याची वचनबद्धता व्यक्त होते. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या एकांकिका १६ डिसेंबर २०१८ रोजी ग्रॅन्ड फिनालेमध्ये सादर होतील व त्यावेळी या कलाकारांना नाटक, सिनेमा आणि टीव्हीवरील मान्यवर कलाकारांच्या ज्यूरी पॅनलसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळेल.

क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर म्हणाले की, या एकांकिकांच्या स्पर्धात्मक उत्सवासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस आणि थिएटर ॲकॅडमीशी सहयोग केला आहे. या वर्षी महाराष्ट्रभरातून प्रवेशिका मागवल्या आहेत. यामुळे ठिकठिकाणचे नाट्य कलाकार आणि विविध विषय सामील होऊ शकतील.